दुरध्वनी क्र.२२८२१२३९
फॅक्स क्र.२२८२२३१२

Tel.No.२२८२१२३९
Fax No.२२८२२३१२

महाराष्ट्र शासन
मत्स्यव्यवसाय विभाग
तारापोरवाला मत्स्यालय, नेताजी सुभाष मार्ग, मुंबई ४०० ००२
Government of Maharashtra
Department of Fisheries
Taraporevala Aquarium, Netaji Subhash Road, Mumbai ४०० ००२
Website: http// fisheries.maharashtra.gov.in
Email : commfishmaha@gmail.com

जा.क्र. मत्स्य/प्रशा/१४११०४/२८/२०२३ दिनांक : २९ / ०३ / २०२३

## कंत्राटी पदभरती जाहिरात

सामान्य प्रशासन विभागाच्या तज्ञ व्यक्तींना करार पद्धतीने घेण्याच्या धोरणानुसार, मत्स्यव्यवसाय विभागात **कनिष्ठ अभियंता** पदांची सेवा कंत्राटी तत्वावर घेण्यास शासन पत्र दिनांक १५/०३/२०२३ अन्वये प्राप्त मान्यतेनुसार, शासकीय/ निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांमधुन आयुक्त मत्स्यव्यवसाय, मुंबई कार्यालयात प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजना व मत्स्यव्यवसाय क्षेत्रातील पायाभूत विकास निधी या योजनेच्या कामांकरिता **कनिष्ठ अभियंता-०२** पदांची सेवा कंत्राटी तत्वावर घेण्यात येत आहे. सविस्तर जाहिरातीचा नमूना (सविस्तर तपशिल, कामाचे स्वरुप, अटी व शर्ती इ.) विभागाच्या http//fisheries.maharashtra.gov.in संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला आहे. निवड समिती सर्व उमेदवारांची मुलाखत घेऊन सर्वानुमते अंतिम निवड करील.

इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज दिनांक २०/०४/२०२३ पर्यंत कार्यालयीन वेळेत (सकाळी ९:४५ ते संध्याकाळी ६:१५ पर्यंत) आयुक्त मत्स्यव्यवसाय, मुंबई कार्यालयास पोहोचतील अशा दृष्टीने पाठवावेत.

| | |
|---|---|
| दरपत्रक मागविणाऱ्या कार्यालयाचे नाव | आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय, तारापोरवाला मत्स्यालय, नेताजी सुभाष मार्ग, चर्नी रोड, मुंबई ४०० ००२ |
| पदाचे नाव | कनिष्ठ अभियंता |
| आवश्यक पद संख्या | ०२ |
| कामाचे स्वरुप | प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजना (PMMSY) व मत्स्यव्यवसाय क्षेत्रातील पायाभूत विकास निधी (FIDF) या योजनांतर्गत राज्यात मासळी उतविण्याच्या ठिकाणी मच्छिमारांना मुलभूत /पायाभूत सोई-सूविधा पुरविण्याच्या कामात सहाय्य करण्यासाठी |
| कालावधी | करार पध्दतीने करार संपेपर्यंत |

**अटी व शर्ती:**

१) उपरोक्त कामासाठी लागणारी विशेष अर्हता तसेच संबंधित कामाचा किमान ०३ वर्षाचा अनुभव आवश्यक.

२) सदर कामासाठी करार पध्दतीने देण्यात येणारी नियुक्ती एका वेळी जास्तीत जास्त ०१ वर्षासाठी असेल. अशा नियुक्तीचे वाढीव कालावधीकरिता दरवर्षी नुतनीकरण करता येईल आणि एकूण कालावधी ०३ वर्षापेक्षा जास्त असणार नाही.

३) नियुक्तीच्या वेळी महागाई भत्त्यासह मिळत असलेल्या निवृत्तीवेतनाएवढी रक्कम (अंशराशीकृत निवृत्तीवेत वगळून) मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यांत येईल.

४) करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशणाबाबत/ सामावून घेण्याबाबतचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/ हक्क नसेल.

५) इच्छूक सेवानिवृत्त अधिकारी यांनी उपरोक्त कामासाठी ते शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असणे आवश्यक आहे.

६) नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विविक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहील. तसे बंधपत्र/ हमिपत्र सादर करणे अनिवार्य असेल.

७) अशा अधिकाऱ्याविरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी.

८) नियुक्ती प्राधिकारी तथा आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकारी यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

९) सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यवसायीक कामात संबंधित अधिकारी/ कर्मचारी गुंतलेला नसावा.

१०) अशा अधिकारी/ कर्मचारी यांनी conflict of interest जाहीर करणे आवश्यक राहील.

११) करार पध्दतीवरील अधिकारी/ कर्मचारी यांनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/ माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक असेल.

१२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक १७ डिसेंबर, २०१६ मधील अटी-शर्ती उमेदवारास लागू राहतील.

(डॉ.अतुल पाटणे भाप्रसे)
आयुक्त मत्स्यव्यवसाय,
महाराष्ट्र राज्य मुंबई